आर.सी.सी. क्र.३३६/२००३
शासन वि. बाबुराव व इतर
नि.क्र.९२

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०६ चा शपथेवर जबाब
माझे नांव — निर्मला मानसिंग परदेशी,
माझे वय – ५६ वर्ष, धंदा : पोलीस निरीक्षक
राहणार – छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू**

०१. सन २००३ मध्ये मी कदीम जालना पोलीस ठाणे येथे पोलीस उप निरीक्षक म्हणुन कार्यरत होते. दि.१८.०१.२००२ रोजी प्रस्तुत गुन्हयाचा तपास माझ्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान मी घटनास्थळी जाऊन दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा केला. सदर पंचनाम्याने कॅशबुक व कंपनीचे इतर अभिलेख जप्त केले. आता मला जप्ती पंचनामा दाखविला असता तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.क्र.८६ देण्यात आलेले आहे. मुद्देमाल पावती फाडुन मुद्देमाल जमा केला. आता मला मुद्देमाल पावती दाखविली असता ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९३** देण्यात येते. मी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले. त्यानंतर रुबी बँक पुणे यांना पत्र दिले. आता मला दाखविले असता ते तेच पत्र आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९४** देण्यात येते. सदर पत्राच्या अनुशंगाने उत्तरासह अहवाल दिला. आता मला दाखविले असता ते तेच आहे. त्यास एकत्रीत **नि.क्र.९५** देण्यात येते. लेखा परीक्षक यांनी दिलेला अहवाल व कागदपत्रे हस्तगत केली. आता मला अहवाल नि.क्र.७० दाखविला असता तो तोच आहे. आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. जप्त मुद्देमाल दाखविल्यास ओळखु शकेल. आता मला जप्त मुद्देमाल नि.क्र.७१, नि.क्र.७२, नि.क्र.७३, नि.क्र.७४, नि.क्र.७५, नि.क्र.७६ दाखविला असता ते तेच आहे. एक आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एन. के. कोहिरे यांच्यामार्फत सुरु–**

०२. टि. व्ही. चे किती संच होते ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद मीच दाखल करुन तपास देखिल मीच केला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांच्याशी संगनमत करुन तपास स्वतःकडे ठेवला. हे म्हणणे खरे नाही की, तपासादरम्यान आरोपीने अफरातफर केली असल्याचे आढळुन आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

(सि. म. पाडोळीकर)

दि. ०१.०४.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.